पुणे शहर पोलीस

# दर्पण

ऑक्टोबर २०१९

## Appreciation Letter... 

Dear Dr. Venkatesam,

Good Morning

Day before yesterday, I had to take my Mother in Law, aged 97+ and barely able to walk, to a doctor on Siddharth road off Max Mueller Bhavan road.

There was no parking on the side near the doctor. So I asked the traffic cop to allow me to park, which he willingly did. After taking her into the clinic I parked my car in the correct location.

After the doctors appointment was over, I brought my car to the earlier location. A traffic police constable's came there and graciously and politely helped to get her settled in. The police constable's name was 'Nana' and he joined the police after a stint in the army. He was later talking to his superior on the walky-talky and I talked to her to commend Nana for being what a policeman should be.

It is good to meet a policeman who cares. May there be many more "Nanas".

Thank you
Sincerely

# उत्कृष्ट तपास

प्रभात – दि. १० ऑक्टोबर, २०१९

# गुन्हेगार कितीही सराईत असू दे; तो सापडतोच!

## घडफोडी करणारा अट्टल गुन्हेगार कोंढवा पोलिसांच्या जाळ्यात अडकला : २८ लाख ८० हजारांचा ऐवज केला हस्तगत

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ९ -** गुन्हेगार कितीही सराईत असला तरी तो कधी ना कधी पोलिसांच्या जाळ्यात सापडतोच. गुन्हा करताना गुन्हेगाराने कितीही काळजी घेतली तरीही तो मागे काहीतरी माग सोडूनच जातो. यामुळे 'कानून के हाथ लंबे होते हैं' हा चित्रपटातला डायलॉग प्रत्यक्षात लागू पडलेला दिसतो. कोंढवा पोलिसांनी अशाच एका गुन्हेगाराला जेरबंद केले आहे. तो गुन्हा केल्यानंतर दर सहा महिन्यांनी त्याचा मोबाइल नंबर, राहते ठिकाणी इतकेच नव्हे



तर घरवालीही बदलायचा. मात्र, अखेर तो पोलिसांच्या जाळ्यात सापडलाच. त्याने अवघ्या नऊ महिन्यांत शहरात २० घरफोड्या करून ७६ तोळे सोने आणि दहा लाखांची रोकड चोरली होती. या घरफोड्यांमधील २८ लाख ८० हजारांचा ऐवज हस्तगत करण्यात पोलिसांनी यश आले आहे.

नीलेश अंकुश काळे (४६, रा. भीमा कोरेगाव, ता. हवेली) असे अटक करण्यात आलेल्या सराईत गुन्हेगाराचे नाव असून सन २००९ पासून घरफोड्या करण्यास त्याने सुरुवात केली. त्याचे रोजीरोटीचे साधन घरफोडीच हेच आहे. एकदा अटक झाल्यानंतर तो २०१७ मध्ये बेलवर सुटला. त्यानंतर त्याने पुन्हा घरफोड्यांचे सत्र अवलंबले. त्यानंतर तो कोंढवा पोलिसांच्या हाती लागला. त्याने कोंढवा, भारती विद्यापीठ, सहकारनगर, हवेली आणि खेड पोलीस ठाण्याच्या हद्दीत मागील नऊ महिन्यांत तब्बल २० घरफोड्या केल्या आहेत. या घरफोड्यांमधील २८ लाख ८० हजारांचा ऐवज हस्तगत करण्यात आला आहे.

ही कारवाईसह पोलीस आयुक्त डॉ. रवींद्र शिसवे, अपर पोली आयुक्त सुनील फुलारी, पोलीस उपायुक्त सुहास बावचे, सहायक पोलीस आयुक्त सुनील कलगुटकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक मुरलीधर करपे, पोलीस निरीक्षक महादेव कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक चेतन मोरे, उपनिरीक्षक संतोष शिंदे, सहायक फौजदार इकबाल शेख, पोलीस कर्मचारी सुशील धिवार, पृथ्वीराज पांडुळे, नीलेश वनवे, उमाकांत स्वामी, योगेश कुंभार, संजीव कांबळे, किरण मोरे, जोतिबा पवार, अजिम शेख, उमेश शेलार, आदर्श चव्हाण व अमित साळुंके यांच्या पथकाने केली.

### एकटाच करायचा घरफोडी

नीलेश हा एकटाच घरफोडी करतो. त्याला कोणीही साथीदार नाही. चोरी केल्यानंतर तो मोबाइल क्रमांक तसेच राहते घरही दर सहा महिन्यांनी बदलत असे. इतके नव्हे तर तो दर सहा महिन्यांनी घरवालीही बदलत होता. त्याने आतापर्यंत तब्बल सहा महिलांशी घरोबा केल्याचे तपासात उघड झाले आहे.

लोकमत – दि. ८ ऑक्टोबर, २०१९

## २० घरफोड्या उघड : ५० गुन्हे दाखल, सीसीटीव्हीच्या आधारे झाला तपास

# घरफोडीप्रकरणी सराइताकडून २८ लाखांचा मुद्देमाल जप्त

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : परिसराची रेकी करुन भरदिवसा घरफोड्या करणाऱ्या एका सराईत गुन्हेगाराला २५० सीसीटीव्हींचा धांडोळा घेतल्यानंतर व ४५० गुन्हेगारांची पडताळणी केल्यानंतर पकडण्यात कोंढवा पोलिसांना यश आले आहे. नीलेश अंकुश काळे (वय ४६, रा. देहुरोड) असे त्याचे नाव आहे. काळे हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असून, त्याच्याकडून २० घरफोडीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. शहर व ग्रामीण पोलिसांच्या हद्दीत त्याच्यावर तब्बल ५० गुन्हे दाखल आहेत. त्याच्याकडून १० लाखांची रोकड, ४७० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने असा २८ लाख ८० हजार रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. त्याच्याकडून चोरीचा माल घेणाऱ्या प्रशांत दत्तात्रय बागेड (रा. चाकण) या सोनाराला अटक केली आहे.

याबाबतची माहिती सहपोलीस आयुक्त रवींद्र शिसवे यांनी दिली. यावेळी अपर पोलीस आयुक्त सुनील फुलारी, उपायुक्त सुहास बावचे, सहायक आयुक्त सुनील कलगुटकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक मुरलीधर करपे, निरीक्षक महादेव कुंभार उपस्थित होते.

- भरदिवसा करायचा घरफोड्या
- अवघ्या १0 ते १२ मिनिटांत घरफोडी करुन जायचा निघून
- २00 ते २५0 सीसीटीव्हींचे फुटेजवरुन काढला माग
- घरफोडी करणाऱ्या ४५0 गुन्हेगारांच्या वर्णनाशी केली पडताळणी
- कोर्ट केसेसवरुन झाले संशयिताचे नाव निष्पन्न
- चोरीचे दागिने घेणाऱ्या सोनारालाही अटक

कोंढवा परिसरातील भाग्योदय नगर येथे गेल्या महिन्यात भरदिवसा घरफोडी झाली होती. या गुन्ह्याचा तपास करताना कर्मचारी सुशील धिवार, पृथ्वीराज पांडुळे, किशोर वळे यांनी घटनास्थळावरील सीसीटीव्ही कॅमेरे तपासण्यास सुरुवात केली. त्यात एक संशयित दिसून आला. त्याचा माग काढताना परिसरातील तब्बल २०० ते २५० सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे फुटेज तपासण्यात आले.

त्यात संशयित लोणी कंद रोडने गेल्याचे दिसून आले. त्याने ४० किमीचा प्रवास केला होता. पुढे ग्रामीण हद्दीत कॅमेरे नसल्याने तपासात अडथळा आला.

सीसीटीव्हीत मिळालेल्या छायाचित्रावरुन गेल्या २ वर्षात येरवडा कारागृहातून सुटलेल्या ४५० आरोपींचे फोटो व नावे मिळविण्यात आली. त्यातील ४ जणांचे वर्णन फुटेजशी जुळले. त्यावरुन शिवाजीनगर न्यायालयातील कोर्ट केसच्या आधारे पोलिसांनी आरोपींची माहिती मिळवली. तेव्हा तो देहुरोड येथे राहत असून, त्याचे नाव नीलेश काळे असल्याचे निष्पन्न झाले. त्याला भीमा कोरेगाव येथून ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडे चौकशी केल्यावर त्याने घरफोडी केल्याची कबुली दिली. ही कामगिरी निरीक्षक चेतन मोरे, संतोष शिंदे, नीलेश वनवे, उमाकांत स्वामी, योगेश कुंभार, संजीव कळंबे यांच्या पथकाने केली.

## भरदुपारी सराइताकडून पिस्तूल जप्त

पुणे : पानशेत येथील बाजारपेठेत रविवारी भरदुपारी गावठी पिस्तूल बाळगून फिरत असलेल्या सराईत गुन्हेगाराला ग्रामीण पोलीस दलातील गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने पकडले आहे. रामा बबन मरगळे (वय २४, रा. पानशेत कुरण बुद्रुक, वरचीवाडी, ता. वेल्हा) असे त्याचे नाव आहे. त्याच्यावर सिंहगड पोलीस ठाण्यात खून व खुनाचा प्रयत्न असे दोन गुन्हे दाखल आहेत. त्याने एका राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यावर गोळीबार करुन खुनाचा प्रयत्न केला होता. त्यामुळे आपल्यावर कोणी हल्ला करेल, अशा भीतीने तो पिस्तूल बाळगत होता, असे त्याने पोलिसांना सांगितले आहे. विधानसभा निवडणूक शांततेत पार पाडण्याकरिता पोलीस अधीक्षक संदीप पाटील यांनी स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाला विशेष मोहीम राबविण्याचे आदेश दिले आहेत. पोलीस निरीक्षक पद्माकर घनवट यांच्या मार्गदर्शनाखाली विविध पथके स्थापन करण्यात आली आहेत. या विशेष पथकाला रविवारी माहिती मिळाली. त्यानुसार सहायक पोलीस निरीक्षक अमोल गोरे, सहायक फौजदार दिलीप जाधवर, श्रीकांत माळी, पोलीस हवालदार रवींद्र शिनगारे यांनी रविवारी दुपारी २ वाजता सापळा रचला होता.

## भेटवस्तू पाठविण्याच्या बहाण्याने फसवणूक करणाऱ्यास दिल्लीतून अटक

पुणे : भेटवस्तू पाठविण्याच्या बहाण्याने महिलेची ५ लाख रुपयांची फसवणूक करणाऱ्या एकास पोलिसांनी दिल्ली येथून अटक केली. त्याला न्यायालयात हजर केले असता ११ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. जॉन व्हॅनलॅनरुटा (वय २९, रा. दिल्ली) असे अटक केलेल्याचे नाव आहे. याप्रकरणी एका ४६ वर्षीय महिलेने फिर्याद दिली आहे. जॉन याची महिलेशी फेसबुकवर ओळख झाली. यानंतर जॉनने फिर्यादी महिलेला भेटवस्तू पाठविली असून दिल्ली येथील कस्टम विभागात अडकले असून, ते सोडविण्यासाठी ५ लाख भरायचे असल्याचे सांगून फसणूक केल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे.

# ‘टेक्नोसॅव्ही’ आरोपीस अटक

## बारा हजार फोन कॉल्स तपासून फरारी खुनीस पोलिसांनी केले जेरबंद

म. टा. प्रतिनिधी, पुणे

### बसवराज देत होता पोलिसांना गुंगारा

- प्रेयसीचा खून करून बसवराज फरारी झाला होता.
- त्याचे 'एमसीए'चे शिक्षण झाल्याने आधुनिक तंत्रज्ञानाची उत्तम जाण त्याला होती.
- एकाच जागी बसून तो सतत 'लोकेशन' बदलत होता.
- बारा हजारांहून अधिक फोनकॉल्सची तपासणी आणि नऊ दिवसांच्या प्रयत्नांनंतर त्याला पकडण्यात आले.



प्रेमप्रकरणातून अभियांत्रिकीचे शिक्षण घेणाऱ्या तरुणीचा खून करून, त्यानंतर वेळोवेळी ठाव-ठिकाणा बदलून पोलिसांना गुंगारा देणाऱ्या टेक्नोसॅव्ही आरोपीला सिंहगड पोलिसांनी अटक केली आहे. 'एमसीए' झाल्याने तंत्रज्ञानाच्या माहितीचा गैरवापर करून आरोपी सतत पोलिसांना गुंगारा देत होता. सिंहगड पोलिसांनी एक दोन नव्हे, तर तब्बल १२ हजार फोन कॉल्स तपासून जेरबंद केले आहे. बसवराज सिद्धप्पा हिळ्ळी (वय २७, रा. तळेवाड, अक्कलकोट, सोलापूर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. तर, प्रियंका वसंत आरेनवरू (वय २२, रा. सोलापूर) असे खून झालेल्या तरुणीचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बसवराज आणि प्रियंका एकमेकांच्या ओळखीचे होते. फेसबुकवरून त्यांची मैत्री झाली होती. प्रियंका सोलापुरात अभियांत्रिकीचे शिक्षण घेत होती. बसवराजचे 'एमसीए'चे शिक्षण झाले होते. तो एका खासगी कंपनीत कामाला होता. काही दिवसांनंतर दोघांच्या मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाले. मात्र, प्रियंकाच्या घरच्यांनी विरोध केल्यामुळे तिने बसवराजला लग्नास नकार दिला. २१ सप्टेंबर रोजी एका वर्कशॉपनिमित्त प्रियंका आईसोबत सोलापूरहून पुण्यात आली होती.

दुसऱ्या दिवशी २२ सप्टेंबरला बसवराजने प्रियंकाला वारंवार फोन केले आणि नऱ्हेतील फ्लॅटवर येण्याचा हट्ट धरला. त्यानंतर प्रियंकाने तेथे जाऊन लग्नास नकार दिला. त्याचा राग आल्याने बसवराजने तिच्यावर चाकूने वार केले व तो पळून गेला. प्रियंकाने मदतीसाठी केलेल्या आरडा-ओरड्यामुळे स्थानिक नागरिकांनी पोलिसांना माहिती दिली व तिला उपचारासाठी ससून रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचारादरम्यान प्रियंकाचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.

दरम्यान, पोलिस बसवराजच्या मागावर होते. त्याचे 'एमसीए'चे शिक्षण झाल्याने आधुनिक तंत्रज्ञानाची उत्तम जाण त्याला होती. त्यामुळे त्याने पोलिसांना गुंगारा देण्यास सुरुवात केली. त्याला पकडण्यासाठी सिंहगड पोलिसांनी वेगवेगळी पथके तयार करून शोधमोहीम सुरू केली होती. पोलिसांच्या पथकांनी अक्कलकोट, सोलापूर, बेंगळुरू, गुलबर्गा परिसर पिंजून काढला. तरीही, बसवराजचा शोध लागला नाही. मात्र, हताश न होता वरिष्ठ पोलिस निरीक्षक नंदकिशोर शेळके यांनी पथकांना तपास सुरू ठेवण्यास सांगितले.

दुसरीकडे त्याला पकडण्यासाठी सहायक निरीक्षक सी. सी. घोरबोले, यशवंत ओंबासे, रफिक नदाफ, दत्ता सोनवणे, अविनाश कोंडे, दयानंद तेलंगे-पाटील, सचिन माळवे, राहुल शेडगे, पुरुषोत्तम गुन्ला, श्रीकांत दगडे, योगेश झेंडे, मोहन भुरूक, वामन जाधव, राजेंद्र सुर्वे, नीलेश जमदाडे, हरीश गायकवाड यांच्या पथकाने 'फोन कॉल्स'ची तपासणी सुरू केली.

या पथकाकडून बसवराजला पकडण्यासाठी तब्बल १२ हजारांहून अधिक फोनकॉल्सची तपासणी करण्यात आली. मात्र, बसवराज टेक्नोसॅव्ही असल्यामुळे तो सातत्याने 'लोकेशन' बदलत असल्याचे भासवित होता. प्रत्यक्षात मात्र तो एकाच ठिकाणी असल्याचे पोलिसांच्या अखेर लक्षात आले. त्यानुसार पोलिसांनी गुलबर्गा परिसरात सापळा रचून बसवराजला ताब्यात घेतले. अखेर नऊ दिवसांच्या अथक प्रयत्नांनंतर बसवराजला पकडण्यात सिंहगड रस्ता पोलिसांना यश आले. चौकशीदरम्यान बसवराजने प्रेमसंबंधातून भांडण झाल्याने प्रियंकाचा खून केल्याची कबुली दिली आहे.

महाराष्ट्र टाइम्स – दि. ०६ ऑक्टोबर, २०१९

# 'फेसबुक'वरील मैत्री पडली पाच लाखांना

म. टा. प्रतिनिधी, पुणे

फेसबुकवरून मैत्री करून गिफ्ट पाठविल्याच्या आमिषाने फसवणूक करणाऱ्या एका व्यक्तीला सायबर सेलच्या टीमने नवी दिल्ली येथून अटक केली आहे. त्याने अनेकांना फसविल्याचे समोर आले आहे.

जॉन वनलरॉता (रा. चाणक्य प्लेस, नवी दिल्ली) असे अटक केलेल्याचे नाव आहे. खडकी बाजार येथे राहणाऱ्या महिलेला नवी दिल्ली येथील एका व्यक्तीने फेसबुकवर 'फ्रेंड रिक्वेस्ट' पाठविली. ती त्यांनी स्वीकारली. त्यानंतर व्हॉट्स ॲपवर दोघांमध्ये चॅटिंग सुरू लागले. त्या वेळी आरोपीने व्हॉट्स ॲपवर गप्पा मारून महिलेला तिच्या वाढदिवसाला महागड्या भेटवस्तू पाठवीत असल्याचे सांगितले. महिलेच्या वाढदिवसाच्या दिवशी तिला दिल्ली येथून 'तुमचे पार्सल आले आहे' असा




फोन आला. हे पार्सल सोडविण्याच्या बहाण्याने आरोपीने वेगवेगळी कारणे सांगून वेगवेगळ्या बँक खात्यावर पैसे पाठविण्यास सांगितले. महिलेने विश्वास ठेवून पाच लाख रुपये भरले होते. पण, कोणतेही गिफ्ट मिळाले नाही. त्यानंतर त्यांनी सायबर पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती.

या गुन्ह्याचा तपास सायबर सेलचे पोलिस निरीक्षक मच्छिंद्र पंडित करत होते. तांत्रिक विश्लेषण केल्यानंतर आरोपी नवी दिल्ली परिसरात असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिस पथकाने नवी दिल्ली येथून आरोपीला अटक केली. त्याच्याकडून एक वायफाय राउटर, तीन मोबाइल, १२ सिमकार्ड असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या आरोपीने अनेकांना फसविल्याचे दिसून येत आहे. त्या दृष्टीने सायबर सेलकडून तपास सुरू आहे. 'सोशल नेटवर्किंग साइट'वरून अशाप्रकारे स्वतःची खरी ओळख लपवून गुन्हे करणाऱ्या टोळ्या विशेषतः उत्तर भारतात कार्यरत आहेत. नागरिकांनी मोहास बळी पडू नये, असे आवाहन सायबर सेलकडून करण्यात आले आहे.

## पॉलिसीच्या बहाण्याने गंडा

हप्ता न भरल्याने बंद पडलेल्या विमा पॉलिसी सुरू करून देण्याच्या बहाण्याने फसवणूक करणाऱ्या टोळीतील एकाला दिल्ली येथून सायबर सेलच्या पोलिसांनी अटक केली आहे. नवी पेठ येथे राहणाऱ्या सेवानिवृत्त ज्येष्ठ नागरिकाने २०१६ ते २०१८ या दरम्यान वेगवेगळ्या कंपनीच्या विमा पॉलिसी घेतल्या होत्या. त्यांचे हप्ते भरले नव्हते. आरोपींनी तक्रारदार यांना फोन करून 'तुमच्या बंद पडलेल्या पॉलिसी सुरू करून देतो. पण, त्यासाठी नव्या पॉलिसी घ्याव्या लागतील. तुम्हाला ८२ लाख रुपये मिळतील,' असे सांगितले. त्यासाठी तक्रारदार यांच्याकडून २६ लाख ९५ हजार रुपये घेतले होते. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी सायबर पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती. त्यानुसार सायबर पोलिस ठाण्याचे निरीक्षक मच्छिंद्र पंडित यांच्या पथकाने श्यामबाबू किशोरीलाल (रा. मोतीनगर, सुदर्शन पार्क, नवी दिल्ली) याला अटक केली आहे.

# ब्रँडेड वस्तूंचे चोरटे कॅबमुळे पोलिसांच्या जाळ्यात

## थेट दिल्लीत जाऊन ठोकल्या बेड्या

म. टा. प्रतिनिधी, पुणे




गुन्हेगारांचा माग काढण्यासाठी पोलिसांना कोणताही एक सुगावा पुरेसा ठरतो. मिळालेल्या सुगाव्याच्या आधारे कड्या जोडून, आरोपींना पकडण्यात कठीण काम पोलिस कौशल्याने करत असतात. दिल्लीतून पुण्यात विमानाने येऊन मॉलमधील 'ब्रँडेड' वस्तू चोरणाऱ्या आरोपींच्या टोळीचा माग काढण्यात त्यांनी ऑनलाइन बुक केलेली कॅब कारणीभूत ठरली. त्या कॅबचा धागा पकडून, पोलिसांनी थेट दिल्लीत जाऊन, तीन आरोपींना बेड्या ठोकल्या.

बाणेर रस्त्यावरील पॅव्हेलियन मॉलमधील रँडो कंपनीची पाच लाखांची पड्याळे चोरीला गेल्याचा प्रकार २३ ऑगस्ट रोजी समोर आला होता. या प्रकरणी त्यांनी चतु:श्रृंगी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. मॉलमध्ये चोऱ्या करणाऱ्या व्यक्ती सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसत होत्या; पण त्या कोण आहेत, कोणत्या ठिकाणी राहतात, याची काहीही माहिती नव्हती. या गुन्ह्याचा युनिट चारकडून समांतर तपास सुरू होता. वरिष्ठ निरीक्षक अंजुम बागवान यांनी दोन गट तयार करून, आरोपींचा शोध सुरू केला. पोलिस उपनिरीक्षक नीलेश महाडिक, सचिन हवळे यांनी आरोपींचा माग काढायला सुरुवात केली आहे. या पथकाने मॉल व परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली. त्या वेळी एका कॅबमधून आरोपी येताना दिसत होते. पोलिसांनी या कॅबचा क्रमांक पोलिसांना मिळाल्यामुळे पोलिसांनी पहिल्यांदा त्या कॅबचालकास शोधून काढले. कॅबचालकाकडे चौकशी केली असता त्याने मंगळवार पेठेतील एका लॉजवरून आरोपींना बाणेर परिसरातील मॉलमध्ये सोडल्याचे सांगितले.

गुन्हे शाखेच्या पोलिसांनी ओळखपत्र पाहिली. त्यामुळे त्यांची नावे समजली; पण आरोपींनी चुकीचे मोबाइल क्रमांक दिले होते. मात्र, त्यांनी ऑनलाइन कॅब बुक केली असल्यामुळे त्यांचा खरा मोबाइल क्रमांक समजला; तसेच विमानतळ येथील सीसीटीव्ही फुटेज आरोपींना मिळाले होते. त्यामुळे आरोपी दिल्ली येथील असल्याचे समजले. त्यानुसार उपनिरीक्षक महाडिक यांच्या पथकाने त्यांचे दिल्लीतील मित्र, जवळच्या व्यक्ती यांची माहिती काढली. त्यानुसार दिल्ली येथे जाऊन आशिष कुशाल बिस्त (वय ३०), आकाश बालकिसन ढाका (वय २६), रवींदरसिंग अमरजित सिंग (वय ३२, सर्व जण रा. नवी दिल्ली) या तिघांना अटक केली. त्यांचा एक साथीदार पळून गेला. त्यांच्याकडे चौकशी केल्यानंतर त्यांनी आठ ऑगस्ट रोजी पुण्यात येऊन ही चोरी केल्याचे सांगितले.

### अशी केली चोरी...

- दिल्ली येथून आरोपी हे आठ ऑगस्ट रोजी पहाटे दीड वाजता विमानाने पुण्याला निघाले.
- पुण्यात पहाटे पाच वाजता लोहगाव विमानतळावरून त्यांनी ऑनलाइन कॅब बुक केली.
- ते मंगळवार पेठेतील एका लॉजवर आले. या ठिकाणी सकाळी आठपर्यंत राहिले. त्या ठिकाणीच त्यांचे साहित्य ठेवले.
- त्यांनी पुण्यात कोठे मॉल आहेत, याची गुगल मॅपवरून माहिती घेतली.
- कॅब बुक करून ते बाणेर येथील मॉलला गेले. रँडो कंपनीची पड्याळे खरेदी करायचे असल्याचे त्यांनी सांगितले.
- पड्याळे दाखविल्यानंतर एक जण दुसरीकडील वस्तू दाखवा; म्हणून त्या व्यक्तीला घेऊन गेला. त्यानंतर दुसऱ्या आरोपीने चार पड्याळे चोरून खिशात घातली.
- कॅबने आरोपी मॉलमधून मंगळवार पेठेत आले. तेथून मुंबईला गेले होते.
- मुंबईत ब्रँडेड टी-शर्ट चोरी करताना त्यांना पकडण्यात आले होते; पण त्या गुन्ह्यात योग्य तपास न झाल्यामुळे आरोपी सुटले.
- त्या ठिकाणाहून दिल्लीला गेले. त्यानंतर त्यांचा शोध घेऊन, त्यांना अटक करण्यात आली आहे.

महाराष्ट्र टाइम्स – दि. १३ ऑक्टोबर, २०१९

# शेजारीच ठरला खरा पहारेकरी

## सख्ख्या भावाच्या घरात चोरी करणाऱ्याला पोलिसांनी केली शिताफीने अटक

Shrikrishna.Kolhe
@timesgroup.com
Tweet : @ShrikrishnaMT

**पुणे :** पुण्यासारख्या महानगरात फ्लॅट संस्कृती रुजू लागल्याने आपल्या शेजारी कोण राहतो, याची अनेकांना माहिती नसते. पण, आपला शेजारीच हाच खरा घराचा पहारेकरी असतो, हे अनेक वेळा शेजाऱ्यांनी चोरट्यांना पकडून दिल्यानंतर समोर आले आहे.




कोंढव्यातही सख्ख्या लहान भावाच्या घरात घरफोडी करणाऱ्या आरोपीचा शोध लावण्यात शेजारचा हाच पहारेकरीच महत्त्वाचा ठरला. 'आपला सख्खा भाऊ घरफोडी करू शकणार नाही,' असा ठाम विश्वास लहान भावाला होता. पण, पोलिसांनी परिसरात व शेजाऱ्यांकडे केलेल्या चौकशीत भाऊ घरी येऊन गेल्याचे समजले आणि मोठ्या भावानेच ही घरफोडी केल्याचे निष्पन्न झाले.

कोंढवा खुर्द भागातील टेम्पल टॉवरमधील एका फ्लॅटमध्ये मोहसीन शेख (वय २८) राहतात. जून २०१९ मध्ये ते फ्लॅट बंद करून बाहेर गेल्यानंतर त्यांच्या फ्लॅटमधील दोन लाख ७० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने घरफोडी करून नेल्याचे आढळून आले. पण, फ्लॅटच्या दरवाजाच्या लॉकला काहीही झालेले नव्हते. त्यामुळे ही चोरी बनावट चावीने केल्याची शक्यता होती.

या प्रकरणी कोंढवा पोलिस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हे शाखेचे पोलिसदेखील या गुन्ह्याचा समांतर तपास करत होते. पोलिसांनी सर्वांकडे चौकशी केली. त्या वेळी युनिट तीनचे पोलिस विल्सन डिसुझा यांना या गुन्ह्यातील आरोपी हा तक्रारदार यांचा सख्खा भाऊच असल्याचे समजले. त्यानंतर वरिष्ठ निरीक्षक राजेंद्र मोकाशी, उपनिरीक्षक संजय गायकवाड, डिसुझा, सचिन गायकवाड यांच्या पथकाने तक्रारदार यांचा भाऊ अरिफ शफी शेख (वय ३६, रा. कोंढवा बुद्रुक) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे चौकशी केल्यानंतर सुरुवातीला त्याने भावाच्या घरात चोरी कशाला करू, असे सांगितले. पण, पोलिसांना परिसरात केलेल्या चौकशीत व शेजाऱ्यांकडून चोरीच्या दिवशी आरोपी हा भावाच्या घरी आल्याची माहिती मिळाली होती. पण, तक्रारदाराच्या मते 'भाऊ चोरी करणार नाही,' असे सांगण्यात येत होते.

शेवटी पोलिसांनी आरोपीला खाक्या दाखविला; तसेच, काही पुरावे समोर ठेवल्यानंतर आपली चोरी उघड झाल्याचे लक्षात येताच त्याने घरफोडीची कबुली दिली.

### पती-पत्नीच्या वादाचा फायदा घेण्याचा प्रयत्न

तक्रारदार मोहसीन यांचे त्यांच्या पत्नीसोबत काही दिवसांपासून सतत वाद सुरू होते. या वादामुळे त्यांचा संसार तुटण्यापर्यंत गेला होता. या संधीचाच फायदा अरिफ याने घ्यायचे ठरविले. त्यासाठी त्याने भावाच्या घराची बनावट चावी तयार करून घेतली. एकेदिवशी घरी कोणी नसताना दागिने चोरून नेले. पती-पत्नीमध्ये वाद होते. पत्नी सोडून जाणार असल्याचे बोलत होती; तसेच, दरवाचे लॉक न तोडता दागिने चोरीला गेल्यानंतर भाऊ त्याच्या पत्नीवरच संशय घेईल, असे त्याला वाटले होते. पण, पोलिसांनी कौशल्याने तपास करीत गुन्हेगाराचा छडा लावला. त्याच्या घरातून काही दागिने पोलिसांनी जप्त केले.

संग्रहित छायाचित्र



### कर्ज फेडण्यासाठी चोरी

तक्रारदार मोहसिन हे छायाचित्रकार म्हणून काम करतात. तर, आरिफ हा कारवर चालक म्हणून नोकरी करतो. मोहसिन हा आरिफ याचा लहान भाऊ आहे. तो कुटुंबीयांसोबत राहतो. त्याला दोन ते अडीच लाख रुपयांचे कर्ज झाले होते. अनेकांकडून व्याजानेही पैसे घेतले होते. त्यासाठी त्याने भावाच्या घरात चोरी केली. चोरलेले सोन्याचे दागिने त्याने पत्नीच्या मार्फत एका सराफाला विक्री केले होते. सराफाला ते दागिने स्वतःचे असून, अडचण असल्यामुळे विकत असल्याचे सांगितले. पैसे तिच्या खात्यावर पाठविण्यास हरकत नसल्याचे म्हटल्यामुळे सराफाला संशय आला नाही. या प्रकरणी अरिफ याची पत्नी अलफिया हिलादेखील अटक करण्यात आली आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली.

PuneMirror - 06 October, 2019

# Cyber police arrest Delhi man for defrauding Pune resident

## The accused had taken ₹26.95 lakh from the retired govt servant

Gunwanti.Paraste
@timesgroup.com
TWEETS @gunwantimirror

The Pune cyber-crime branch has arrested a person for defrauding a retired government servant on the pretext of getting him the maturity value of some lapsed insurance policies.

The accused, identified as Shyambabu Kishori Lal, a resident of New Delhi, convinced the victim to pay a large amount of money to 'restart' these policies which had lapsed due to non-payment of instalments. The cyber police have registered case against him.

In his complaint to the police, the victim, who is a senior citizen living in Navi Peth, said that he had taken out several insurance policies under different insurance companies from 2016 to 2017. However, they had lapsed as he had not paid the instalments and he had given up hope of getting his money back.

He, however, began to hope again after the accused called him one day on his mobile phone and said that his policies had bought over by Bajaj Services, a company he said that he worked for, and stated that he could reactivate his lapsed policies. Lal also told him that him that he needed to get new policies as his old policies had matured, the value of which was Rs 82.92 lakh. The victim said that Lal told him he could get the entire amount if he paid tax and service charges on the said sum. Upon hearing this, the victim transferred Rs 26.95 lakh to Lal. Following the transaction, Lal stopped taking the victims phone calls and blocked him.

After getting the complaint, the cyber-crime cell team investigating the case set a trap in Delhi and detained Lal on October 4. Police are investigating whether he has cheated anyone else in this way.

PuneMirror - 08 October, 2019

# Habitual thief marries six women in two years

## Kale shifted localities to celebrate and then wed anew

Gunwanti.Paraste
@timesgroup.com
TWEETS @gunwantimirror

Kondhwa police have arrested a man who allegedly married six different women in various localities of the city after committing big break-in robberies in each area.

The accused has been identified as Nilesh Ankush Kale (46).

The case came to light after he was arrested in relation to a break-in robbery in Kondhwa. On interrogation, he spilled the beans and told cops about everything. Kale has a criminal record and police have linked him with 20 break-in robbery cases so far. He has been charged in these cases. They suspect he is involved in another 10 incidents.

According to the police, the accused's modus operandi was that he would target houses in broad daylight, when people would either be at work or dropping their children to school. they said he would commit robberies in daytime as he used to get confused about how to do it at night.

Police have recovered stolen goods and cash worth a combined Rs 28.8 lakh from Kale. This includes 470 gram gold jewellery and Rs 10 lakh in cash.

They said that whenever he successfully pulled off a big robbery, he wanted to celebrate so he would shift to another locality and marry a woman. This led to him marrying six different women over a period of two years.

"Jeweller Prashant Dattatreya Bagade who stays in Chakan has also



Police with the stolen goods

been arrested as he bought stolen gold from Kale," said joint commissioner of police Ravindra Shiswe and additional commissioner Sunil Pulari in a press conference.

In the past few months, the number of burglaries had increased in Bhagodaya Nagar in Kondhwa. Police linked Kale to these incidents after reviewing footage from CCTV cameras. Overall, police investigated footage from 280 cameras. However, due to no CCTV cameras being present in rural areas, investigation was hampered. Despite this, police managed to identify Kale and other accused in the thorough records from Yerwada jail. Kale was released from jail in 2017.

Police recovered the information from a court in Shivajinagar on that basis. After conducting a technical investigation, they figured out that Kale stayed in the Dehu Road area. But by the time they had figured that out, the accused had shifted to Koregaon Bhima. Police finally tracked him down there and arrested him. On further questioning, he confessed to the crime and said that he had changed residences six times since 2017.

PuneMirror - 12 October, 2019

# Man who stole mobile phones to access OTP, transfer money held

## Chandan Nagar police traced accused in Nashik; culprit targeted flatmates and stole their phones

Gunwanti.Paraste
@timesgroup.com
TWEETS @gunwantimirror

Cops have nabbed a man in connection with cell phone thefts in the city. Identified as Rishikesh Bombale, the man in question would approach paying guests and move into rooms with unsuspecting people. After befriending his roommates, Bombale would steal their mobile phones.

His offences did not end there. Bombale's modus operandi included taking snapshots of his roommates' credit and debit cards. He then made online transactions and transferred money from other accounts to his own, using the card numbers captured in the images and using the one-time passwords (OTPs) received on the stolen cell phones. Bombale carried out the crimes before his flatmates could even figure out that their cell phones went missing or money had been debited from their accounts. Chandan Nagar police have traced the accused in Nashik.

Chaitanya Kesi Reddy, a 30-year-old IT professional, who stayed with the accused at a PG accommodation in Kharadi for about two weeks, lodged a complaint regarding his missing cell phone. Bombale had apparently told Reddy that he was in the city for academic coaching in Pune but would hardly step out of his room.

According to the FIR filed, on October 2, the complainant was to go to his hometown and the accused had offered to drop him to the station. When Reddy came out of the loo after getting ready to leave, Bombale was nowhere to be seen. The accused's luggage was also missing. With the help of his flat owner, Reddy



Accused Rishikesh Bombale

tried to get in touch with Bombale, but to no avail. He anyway left for his hometown. On reaching home, when Reddy checked his email on his laptop, he was left shell-shocked to receive a notification alerting him of a monetary transaction to the tune of Rs 1,53,000 from his account to Bombale's account through Paytm. Reddy's high-end phone and cash totalling Rs 2,37,000 was wiped out by the accused. Reddy then lodged a complaint with Chandan Nagar police.

Shankar Khatke, senior police inspector attached to Chandan Nagar police station, told *Mirror*, "The accused has been booked under sections 380 and 420 of the Indian Penal Code and Information Technology Act 66 (C). Our team reached Nashik and arrested Bombale."

"Bombale would track down those who were new to the city and, therefore, made for easy targets. We appeal citizens to first do a background check on potential roommates before moving in together," cautioned Khatke.

लोकमत – दि. १ ऑक्टोबर, २०१९

# बदनामीची धमकी देऊन बलात्कार केल्याप्रकरणी दहा वर्षांची सक्तमजुरी

## पीडितेच्या आईची तक्रार : १२ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** बदनामी करण्याची धमकी देत तरुणीवर सतत बलात्कार केल्याप्रकरणी एकाला विशेष न्यायाधीश आर. व्ही. आदोणे यांनी १० वर्षे सक्तमजुरी व १२ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. दंडाच्या रकमेपैकी ८ हजार रुपये पीडित मुलीला द्यावेत, असे न्यायालयाच्या आदेशात नमूद केले आहे.

राकेश तिकोने (वय ३३) असे शिक्षा सुनावलेल्याचे नाव आहे. याबाबत पीडित १६ वर्षीय मुलीच्या आईने फिर्याद दिली आहे. ऑगस्ट [illegible] कालावधीत ही घटना घडली.

फिर्यादी यांचा फ्लेक्स प्रिंटींगचा व्यवसाय आहे. त्यांच्या दुकानासमोर तिकोने याचा पेपर कटिंगचा व्यवसाय आहे. फिर्यादी हे त्यांच्याकडे येणाऱ्या ग्राहकांना तिकोने यांच्याकडे पेपर कटिंगसाठी पाठवत होते. त्यातून फिर्यादी यांच्या कुटुंबाची व तिकोने याची ओळख झाली होती. त्या वेळी तिकोने याने फिर्यादीच्या अल्पवयीन मुलीला 'तू मला आवडतेस,' असे सांगितले. त्यानंतर ते दोघे व्हॉट्सॲप आणि फेसबुकच्या माध्यमातून एकमेकांच्या संपर्कात आले. त्यांच्यामध्ये मैत्री झाली. त्यानंतर [illegible] नेले आणि तिथे तिच्यावर बलात्कार केला. त्यानंतर अनेकदा लॉजवर नेऊन बलात्कार केला, असे फिर्यादीत नमूद केले आहे. सरकारी पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी वकील लीना पाठक यांनी काम पाहिले. खटल्यामध्ये त्यांनी ८ साक्षीदार तपासले. त्यामध्ये पीडित मुलीची साक्ष महत्वाची ठरली. गुन्हा गंभीर असल्याने आरोपीला जास्तीत जास्त शिक्षा देण्याची मागणी ॲड. पाठक यांनी युक्तिवादादरम्यान केली. त्यानुसार न्यायालयाने त्याला सक्तमजुरीची शिक्षा सुनावली. न्यायालयीन कामकाजात सहायक पोलीस उपनिरीक्षक सय्यद, पोलीस हवालदार हिरे आणि जाधव यांनी मदत केली.

प्रभात – दि. १३ ऑक्टोबर, २०१९

# खून करणाऱ्या म्होरक्यासह पाच जणांना अटक

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १२ -** पूर्ववैमनस्यातून एका तरुणाच्या डोक्यात धारदार शस्त्र घालून त्याचा खून करण्यात आला होता. ही घटना बुधवारी मध्यरात्री दीड वाजता ताडीवाला रोड झोपडपट्टीमध्ये घडली. याप्रकरणी बंडगार्डन पोलिसांनी म्होरक्यास तासाभरात अटक केली. तर त्याच्या साथीदारांनाही दोन पथके तयार करून जेरबंद करण्यात आले.

अतिश आनंदा वानखेडे (वय २३) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी अतिशचा भाऊ सतीश आनंदा वानखेडे (वय २३, रा. ताडीवाला रोड झोपडपट्टी) यांनी बंडगार्डन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्याच्या खून प्रकरणी आकाश गायकवाड (रा. ताडीवाला रस्ता) यास बंडगार्डन पोलिसांनी तासाभरात अटक केली. चौकशीत त्याने त्याच्या चार साथीदारांसह खून केल्याची माहिती दिली. त्यानुसार दोन पथके तयार करून त्याच्या चारही साथीदारांना अटक करण्यात आली.

साथीदारांना पकडण्यासाठी वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील तांबे व पोलीस निरीक्षक दिगंबर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी रुपेश पिसाळ, किरण तळेकर तसेच सहायक पोलीस निरीक्षक संदीप जमदाडे, पोलीस कर्मचारी फिरोज शेख, मोरे, सानप याचे एक पथक अशी दोन पथके तयार करण्यात आली. दोन्ही पथकांनी चारही आरोपींना ताब्यात घेतले. ही कारवाई पोलीस उपायुक्त शिरीष सरदेशपांडे, सहायक पोलीस आयुक्त रवींद्र रसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# फसवणूक करणाऱ्याला दिल्लीतून अटक

## २६ लाख ९५ हजारांचा गंडा

**पुणे : प्रतिनिधी**

बंद पडलेली विमा पॉलिसी परत सुरू करून देण्याच्या नावाखाली ज्येष्ठ नागरिकाला गंडा घालणाऱ्या टोळीतील एकाला सायबर पोलिसांच्या पथकाने दिल्लीतून जेरबंद केले आहे. शामबाबू किशोरीलाल (रा. ३९९, मोतीनगर, सुदर्शन पार्क, नवी दिल्ली) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. यावेळी आरोपीच्या ताब्यातून मोबाईल व दोन सिमकार्ड जप्त करण्यात आली आहेत. या प्रकरणी नवी पेठेतील एका ज्येष्ठ नागरिकाने फिर्याद दिली होती. फिर्यादींनी सन २०१६ ते २०१८ या कालावधीत वेगवेगळ्या कंपन्यांच्या दोन विमा पॉलिसी काढल्या होत्या. मात्र, काही काळ त्या दोन्ही पॉलिसी बंद होत्या. नेमका याच संधीचा फायदा घेत आरोपींनी ज्येष्ठ नागरिकाला आपल्या जाळ्यात खेचले. हप्ता न भरल्यामुळे बंद पडलेल्या विमा पॉलिसी सुरू करून देत असल्याचे प्रलोभन दाखवत पॉलिसी मॅच्युअर झाल्याने त्याची मोठी रक्कम तुम्हाला मिळेल असे आरोपीने सांगितले.

तसेच सतत फोनद्वारे संपर्क करत तुमच्या पॉलिसी आमच्या कंपनीने घेतल्या असून, त्या तुम्हाला चालू करता येतील असे खोटे सांगितले. पॉलिसीचे तुम्हाला ८२ लाख ९५ हजार रुपये मिळतील असे म्हणत टॅक्सच्या नावाखाली २६ लाख ९५ हजार रुपये भरून घेतले होते. एवढेच नाही तर फिर्यादींनी टॅक्सच्या नावाने भरलेली रक्कम परत मिळणार आहे, असेदेखील सांगितले होते. त्यामुळे फिर्यादींनी आरोपींच्या प्रलोभनांना बळी पडत त्यांनी सांगितल्याप्रमाणे वेगवेगळ्या बँक खात्यावर पैसे भरले. मात्र, वाट पाहूनदेखील पैसे मिळत नाहीत हे लक्षात आल्यानंतर त्यांनी सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. तपास करत असताना तांत्रिक विश्लेषणाद्वारे आरोपी हा दिल्लीतील असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार एका पथकाने आरोपी वास्तव्यास असलेल्या ठिकाणी सापळा रचून त्याला जेरबंद केले. आरोपीला द्वारका येथील न्यायालयात हजर केले असता ८ ऑक्टोबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

ही कामगिरी उपायुक्त आर्थिक व सायबर गुन्हे संभाजी कदम यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक मच्छिंद्र पंडित, सहायक निरीक्षक गंगाधर घावटे, कर्मचारी राजकुमार जाबा, दीपिका मोहिते, बाबासो कराळे, शाहरूख शेख यांच्या पथकाने केली.

### हातचलाखी करून १६ हजार घेऊन केला पोबारा

नोटा मोजत असताना अचानक एक व्यक्ती दुकानात आली अन् फाडफाड इंग्जी बोलू लागली. तिने हातातील नोटा पाहण्यास घेतल्या अन् हातचलाखी करून त्यातील २ हजाराच्या ८ नोटा घेऊन पोबारा केला. लष्कर परिसरात ही घटना शुक्रवारी घडली. या प्रकरणी राजेश गिडवाणी (४७, रा. वानवडी) यांनी लष्कर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राजेश गिडवाणी यांचे एमजी रस्त्यावरील अशोक-विजय कॉम्प्लेक्स येथे सारेगम म्युझिक अँन्ड टॉय या नावाने इलेक्ट्रॉनिक्स खेळणी विक्रीचे दुकान आहे. शुक्रवारी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास फिर्यादी राजेश गिडवाणी हे दुकानात नोटा मोजत होते. यावेळी एक साधारण ४५ वयाची व्यक्ती दुकानात आली. तिने येताच इंग्रजीतून बोलण्यास सुरुवात केली. तसेच फिर्यादींना नोटा दाखवा, असे म्हणून हातातून नोटांचे बंडल घेतले. नोटा पाहत असतानाच त्याने हातचलाखी करून त्यातील २ हजाराच्या ८ नोटा काढून घेऊन पोबारा केला. काही वेळाने फिर्यादींनी पैसे मोजले असता त्यांना हा प्रकार लक्षात आला. त्यानंतर त्यांनी पोलिसांकडे तक्रार दिली. तपास सहायक निरीक्षक सी. एम. सूर्यवंशी हे करीत आहेत.

**पुढारी** – दि. १८ ऑक्टोबर, २०१९

# ५९ लाखांचे दागिने जप्त; दोघेजण ताब्यात

पुणे : प्रतिनिधी

स्वारगेट पोलिसांनी दोन जणांच्या ताब्यातून तब्बल ५९ लाखांचे सोन्या-चांदीचे दागिने जप्त केले आहेत. या दोघांना ताब्यात घेण्यात आले असून, उपेंद्र रामबीर परमार (वय २१, रा. काळबादेवी रस्ता, मुंबई ) आणि गोरख गोपालसिंग परमार (रा. मंगळवार पेठ, सोलापूर ) अशी त्यांची नावे आहेत. सोलापूरहून सोने घेऊन हे दोघे पुण्यात आले होते. न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर केला आहे.

गुरुवारी पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास स्वारगेट पोलिसांनी बस स्थानकात ही कारवाई केली. एवढ्या मोठ्या प्रमाणात त्यांनी सोने कोठून आणले होते याची चौकशी पोलिस करीत आहेत. याबाबत संबंधित विभागाला कळवण्यात आले आल्याची माहिती वरिष्ठ निरीक्षक ब्रह्मानंद नाईकवडी यांनी दिली.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर स्वारगेट पोलिसांकडून ठिकठिकाणी पेट्रोलिंग करण्यात येत आहे. त्यानुसार आज पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास स्वारगेट पोलिसांचे एक पथक गस्तीवर असताना स्वारगेट एसटी स्थानकात दोघेजण संशयास्पद उभे राहिल्याचे त्यांना दिसून आले. अधिक चौकशी करीत झडती घेतली असता त्यांच्याकडील पिशवीत ५९ लाख रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने आढळून आले.

दागिन्यांचा पंचनामा करुन जप्तीची कारवाई करण्यात आली. दागिन्यांची माहिती क्षेत्रीय निवडणूक अधिकाऱ्यांना देण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. ही कामगिरी वरिष्ठ पोलिस निरीक्षक ब्रह्मानंद नाईकवडी, पोलिस निरीक्षक गुन्हे शब्बीर सय्यद, महिला सहायक पोलिस निरीक्षक शबनम शेख, अभिजित राउत, बालाजी पवार, दीपक गायकवाड, सुधीर शेळके यांच्या पथकाने केली.

**TIMES OF INDIA - 06 October, 2019**

# Centring worker in cop net for killing colleague

TIMES NEWS NETWORK

**Pune:** The questioning of a centring worker in a missing person's complaint helped the Hadapsar police crack a murder case.

The quizzed worker, Balaji Pakhale (30), was arrested on Saturday from Wadki for killing his colleague, Vishal Ovhal (25), over a dispute on having an illicit relationship with his wife and dumping the latter's body in a canal on September 29. Police have sought help of the fire brigade to conduct searches in the canal to recover the body.

Ovhal, a resident of Phursungi, had left for work on the morning of September 29 but did not return home till the afternoon next day. His parents registered a missing person's complaint with the Hadapsar police.

"Police, during the investigation, received information that Ovhal was last seen with Pakhale. We summoned Pakhale for questioning and he admitted to killing Ovhal and dumping the body in the canal over the issue of refusing to maintain distance from his wife," said senior inspector Raghunath Jadhav, the Hadapsar police station in-charge.

Jadhav said, "The duo met near a liquor shop on Saswad Road and consumed alcohol on September 29. Then a dispute started. Pakhale in a fit of anger, picked up a wooden stick and hit Ovhal on his head. Ovhal died instantly. We have converted the missing person's complaint into a murder case."

# आरोपीला पकडण्यासाठी १२ हजार कॉल्स धुंडाळले

## खून प्रकरणातील आरोपी अखेर जाळ्यात; सिंहगड रोड पोलिसांची कामगिरी

पुणे, दि. २ (प्रतिनिधी) - प्रेमप्रकरणातून अभियांत्रिकी तरुणीचा खून केलेला टॅक्नोसॅव्ही आरोपी पोलिसांच्या हातावर तुरी देऊन वारंवार ठिकाणे बदलत असल्याचे भासवित होता. एमसीए झाल्याने तांत्रिक ज्ञानाच्या आधारे सातत्याने लोकेशन बदलून हुशारकीचा आव आणत होता. मात्र, हार मानतील ते सिंहगड पोलीस कसले? दिवस-रात्र तपासकार्यात झोकून देत तब्बल १२ हजारांवर फोनकॉल्सचे रेकॉर्डिंग तपासून पोलिसांनी टॅक्नोसॅव्ही आरोपीला जेरबंद केले.

बसवराज सिद्धप्पा हिळळी (वय २७, रा. तळेवाड, अक्कलकोट, सोलापूर) असे अटक केलेल्याचे नाव आहे. तर, प्रियंका वसंत आरेनवरू (वय २२, रा. सोलापूर) असे खून झालेल्या तरुणीचे नाव आहे.

बसवराज आणि प्रियंका एकमेकांच्या ओळखीचे होते. प्रियंका सोलापुरात अभियांत्रिकीचे शिक्षण घेत होती, तर बसवराज एमसीए झाल्याने एका खासगी कंपनीत कामाला होता. काही दिवसांनंतर दोघांच्या मैत्रीचे रुपांतर प्रेमात झाले. मात्र, प्रियंकाच्या घरच्यांनी विरोध केल्यामुळे तिने बसवराजला लग्नास नकार दिला. २१ सप्टेंबरला एका वर्कशॉपनिमित्त प्रियंका आईसोबत पुण्यात आली होती. दुसऱ्या दिवशी २२ सप्टेंबरला बसवराजने प्रियंकाला तगादा लावत नऱ्हेतील फ्लॅटवर बोलाविले. प्रियंकाने त्याठिकाणी जाऊन लग्नास नकार दिला. त्याचा राग आल्याने बसवराजने तिच्यावर चाकूने वार करून तो पसार झाला. आरडाओरड्यामुळे स्थानिकांनी त्याठिकाणी धाव घेत पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर प्रियंकाला ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला.

सिंहगड पोलिसांनी वेगवेगळ्या टीम तयार करून शोधमोहीम सुरू केली. पोलिसांच्या टीमने अक्कलकोट, सोलापूर, बंगळुरू, गुलबर्गा परिसर पिंजून काढला. तरीही बसवराज मिळून आला नाही. दुसरीकडे त्याला पकडण्यासाठी फोनकॉल्सची तपासणी सुरू करण्यात आली. तब्बल १२ हजारांवर फोनकॉल्सची तपासणी करण्यात आली. मात्र, बसवराज टॅक्नोसॅव्ही असल्यामुळे तो सातत्याने लोकेशन बदलत असल्याचे दाखवित होता. प्रत्यक्षात मात्र तो एकाच ठिकाणी असल्याचे पोलिसांच्या लक्षात आले. त्यानुसार पोलिसांनी गुलबर्गा परिसरात सापळा रचून बसवराजला ताब्यात घेतले.

ही कामगिरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक नंदकिशोर शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक सी. सी. थोरबोले, यशवंत ओंबासे, रफिक नदाफ, दत्ता सोनवणे, अविनाश कोंडे, दयानंद तेलंगे-पाटील, सचिन माळवे, राहुल शेडगे, पुरुषोत्तम गुन्ला, श्रीकांत दगडे, योगेश झेंडे, मोहन भुरुक, वामन जाधव, राजेंद्र सुर्वे, नीलेश जमदाडे, हरीश गायकवाड यांच्या पथकाने केली.

TIMES OF INDIA - 06 October, 2019

# 'Handsome' gang's kingpin in cop net

## Four Stolen Wristwatches Recovered From Him

Times News Network

**Pune:** The city crime branch on Friday arrested the leader of "Handsome Group" — a Delhi-based gang — for stealing four luxury wristwatches worth over Rs5 lakh from a mall on SB Road.

A team headed by inspector Anjum Bagwan zeroed in on the gang's kingpin — Vivek Manavsingh Rawat (33) of Faridabad near Delhi. Police recovered all the four stolen wristwatches from his possession. His criminal antecedents are being checked with the Delhi police.

The gang of four school dropouts were brand conscious. They would steal only high-end goods to make money. The gang members would fly to different cities for executing the theft plans.

Rawat, a handsome man, maintained a high-flying lifestyle, said the police. The other members of the gang also dressed nicely to venture into different malls and while travelling in planes.

### BRAND CONSCIOUS

The theft of wristwatches in the city mall had occurred on August 8. It came to light on August 23 when the mall authorities checked the inventory. The crime branch officials subsequently arrested three members of the "Handsome Group, identified as Ashish Kushal Bist, Akash Balkishan Dhaka and Ravindarsingh Amarjitsingh, all residents of Delhi.

Deputy commissioner of police (crime) Bachchan Singh said, "Rawat and the three others arrested in the case were schoolmates. The school dropouts came together and formed the gang. As Rawat hails from a good family, he is fairly aware about different brands and their value in the resale market."

Singh said, "The gang members decided to steal only branded articles from malls. They used to visit the malls in Pune, Mumbai and other cities in India to steal costly branded articles. They used to travel to different cities by flights. The three men arrested earlier executed the thefts, while Rawat looked for customers in the national capital region."

Bist, Dhaka and Amarjitsingh had also stolen costly T-shirts from a mall in Mumbai. They were subsequently arrested .

Inspector Bagwan said Rawat used to maintain a good lifestyle by keeping some of the stolen goods for himself. He used to sell the rest with the help of his affluent friends.

TIMES OF INDIA - 06 October, 2019

# Ex-employee arrested for stealing 21 gas cylinders

Times News Network

**Pune:** A former employee of a gas agency was arrested by the Airport police on Friday on the charges of stealing 21 commercial gas cylinders worth Rs58,800 from the godown of the company in Lohegaon.

The police said the accused, Bhikaram Thichad (25) from Jodhpur, stole the cylinders sometime between Wednesday and Thursday, in a bid to extract revenge from the gas agency over his pending dues of Rs5000.

Senior inspector Gajanan Pawar, in-charge of the Airport police station, said, "Thichad entered the godown at Harantale Vasthi by breaking the gate, loaded the stolen cylinders in a tempo that he had brought with him, and fled. The security guard was on leave then. Investigations revealed that Thichad committed the theft because he had not received his salary of Rs5,000 from the gas agency owner even after leaving the job nearly three months back."

Inspector (crime) Balwant Mandage said, "We zeroed in on Thichad after a CCTV camera installed inside the godown had captured images of him while committing the crime. The agency owner, Vivek Denglurkar (40), filed a complaint after the former employee did not return the cylinders."

A magisterial court on Saturday remanded Thichad to police custody till October 7.

TIMES OF INDIA - 11 October, 2019

# Two gang members in net for thefts at wedding halls

TIMES NEWS NETWORK

**Pune:** The Wanowrie police have arrested two members of a gang involved in stealing valuables from wedding halls and found on them gold ornaments, cash and a car, collectively worth Rs8.85 lakh.

The police said Vilas Dagade (27) and Lahu Jadhav (40) were both from Khulewadi near Chandannagar. "Dagade's wife, also a member of the gang, is on the run," said senior inspector Krantikumar Patil.

The police have detected three such thefts, including two registered in the Wanorie area . "We are expecting to detect more cases following their arrest," Patil said.

Acting on a tip-off, the police laid a trap and took Dagade into custody on Sunday. "During questioning, Dagade revealed Jadhav's name and admitted their involvement in three thefts in wedding halls. We arrested Jadhav, but Dagade's wife is still on the run," Patil said.

Wanowrie police assistant inspector Asaram Shete said that the gang would first select the marriage halls and Dagade's wife would then get inside by posing as a relative.

"She would wear make-up and costume jewellery to avoid anyone's suspicion. She mainly used to target the brides' chambers, as these rooms remain crowded. She would keep a close eye on the women carrying purses or bags, lift them and sneak out of the halls," he said.

The officer added that the woman would drive away in cars, with her husband and other gang members, waiting outside the halls.

Inspector Patil said the Pune rural police had arrested Dagade and his wife in June and detected thefts in marriage halls in Saswad, Walchandnagar, Talegaon Dhamdhere, Otur, Wagholi and other parts of the district. The two had later been released on bail.

## Appreciation Letter...

To,
Dr. K. Venkatesham
Commissioner of Police, Pune City

Respected Sir

We would like to take an opportunity to express our heartfelt gratitude for the immense help we received from the Bibwewadi Police Personal. World came crashing down on us when we lost our father and our mother was seriously wounded. It was Police Nayak Mr. Bhosle (6481) who noticed that she was still alive and alerted the family who immediately took her to hospital. Our mother is alive today because of the timely help imparted by the Bibwewadi police.

In the time of grief we were helped by ASI Mr. Mahajan and PC Mr. Yadav with the legal formalities in Sasoon Hospital.

We would always be indebted for the assistance provided by the whole team of Bibwewadi Police. A special word of gratitude especially for PSI Mr. Atul Thorat (for his emotional and overall assistance), PN Mr. Devkute (7546) & PC Mr. Lokhande (has been very helpful while recording our statements and apologized to us in case of delays). The whole team was lead by PI Mr. Kumar Ghadge.

Like every law abiding citizen we used to be scared of police and police stations but our experience with the Bibwewadi Police has completely changed our perception.

We (the sister duo) apart from indebted will always be available and more than happy to be of any help to the Pune Police.

Unfeigned Regards,
Daughters of a doting father

P.S. We would be very happy if this mail would be shared over the social media and other forums but request you not to reveal our identity.


150 women rescued fr
sex rackets since Janu
पोलिसांनी साजरी केली गरिबाच्या घरी दिवाळी
अहमदनगर खुनातील गुन्हेगार गजाआड
खवल्या मांजराच्या विक्रीसा
आलेल्या तिघांना अटक
दीड कोटींची
ब्राउन शुगर जप्त
बुधवार पेठेतील वेश्याव्यवसायावर छापा
बेकायदा पिस्तूल बाळगणारा अटकेत
बोनस देण्याच्या
बहाण्याने फसवणूक
करणाऱ्याला अटक
3 held for possession
of pangolin; third
case in 10 months
कोकेन विक्री करणारा
नायजेरियन अटकेत
अमली पदार्थांची तस्करी
करणाऱ्या दाम्पत्याला अटक
Cops bring back minor
who ran off from home
पोलिसांच्या योग्य नियोजनामुळे मतदान शांततेत
पळालेला मुलगा पालकांकडे सुपूर्द
हरवलेल्यांच्या शोधासाठी
पोलिसांचा मिसिंग सेल
गुन्हे शाखेच्या विशेष पथकाकडून
२२ फरारी आरोपींना अटक
दाम्पत्याने एकत्र जीवन संपवायचे ठरविले...
...पण नियतीला त्यांचा निर्णय नव्हता मान्य
लॉटरी जुगार
स्वातंत्र्य उपभोगण्यासाठी ती आली पुण्यात
पोलिसांमुळे पालकांकडे
पोहोचली सुखरूप परत
लग्नाच्या आमिषाने
फसवणारा झाला गजाआड
फसविणारे दोन नायजेरियन जाळ्यात
Crime Branch Unit III nabs
duo with drugs worth ₹77L
रिक्षात विसरलेले
दागिने मिळाले परत
पोलिसांनी सीसीटीव्हीवरून काढला माग
संघटनांतर्फे महिला पोलिसांचा सन्मान
खुनाच्या प्रयत्नाच्या
गुन्ह्यातील फरारी
पोलिसांच्या जाळ्यात
पोलिस आयुक्तांची
हेगारी 'सफाई' मोहीम सुरू
'दामिनी'ने अल्पवयीन मुलीला
दिले आई-वडिलांच्या ताब्यात
Cops bring back minor
who ran off from home
विधिसंघर्षित मुलां
भांडण करून पळालेला
मुलगा सुखरूप परत
स्वातंत्र्य उपभोगण्यासाठी ती आली पुण्यात
जीवन संपवायचे ठरविले...
यांचा निर्णय नव्हता मान्य!
मोबाईल वेडापायी मुलीने सोडले घर
रिक्षात विसरलेले
दागिने मिळाले परत
खून करणाऱ्या म्होरक्यासह पाच जणांना अटक
फसवणूक करणाऱ्याला दिल्लीतून अटक